जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 JUN 2025
लोकमत



'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' आणि दत्तात्रय घुटुगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरक

## डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात दोन ग्रंथांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे समग्र कार्य हे एकमेवाद्वितीय आणि प्रेरक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या वतीने डॉ. मच्छिंद्र गोफणे व डॉ. नीलेश शेळके लिखित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' आणि दत्तात्रय घुटुगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, नेटक्या संपादनामुळे हे ग्रंथ वाचनीय झाले आहेत. घुटुगडे यांच्या कागदपत्र सूचीच्या संकलनामुळे करवीर संस्थान आणि इंदूर संस्थानदरम्यान असणारे सहसंबंध सामोरे आले आहेत.

डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. नीलेश शेळके, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2025

सकाळ



कोल्हापूर : ग्रंथांच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. नीलेश शेळके, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रणधीर शिंदे आदी.

# अहिल्यादेवींचे कार्य एकमेवाद्वितीय

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रकाशन

कोल्हापूर, ता. ३१ : 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे समग्र कार्य एकमेवाद्वितीय व प्रेरक आहे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ.मच्छिंद्र गोफणे व डॉ. नीलेश शेळके लिखित 'अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' व दत्तात्रय घुटुगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' ग्रंथांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते ग्रंथांचे प्रकाशन झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, 'अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्ताने विद्यापीठात विविध विचारवंत मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. ती व्याख्याने केवळ कार्यक्रम पत्रिकेपुरती न राहता त्या कार्यक्रमाच्या पाऊलखुणांचे जतन करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न म्हणजे डॉ. गोफणे आणि डॉ. शेळके यांचा ग्रंथ आहे. नेटक्या संपादनामुळे हा ग्रंथ सुबक आणि वाचनीय झाला आहे. घुटुगडे यांच्या कागदपत्र सूचीच्या संकलनामुळे करवीर संस्थान आणि इंदूर संस्थान यांच्यादरम्यान असणारे सहसंबंध समजण्यास मदत होते. शाहू महाराजांनी होळकर संस्थानाशी केलेला पत्रव्यवहार सामोर आला आहे.'

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, 'अहिल्यादेवी होळकर अध्यासनाने अवघ्या दीड वर्षांत केलेले हे ग्रंथनिर्मितीचे कार्य मौलिक आहे. याद्वारे मराठेशाहीच्या अलक्षित इतिहासाचे जागरण झाले आहे, ही महत्त्वाची बाब आहे.' यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बीए., बीएस्सी., एमबीए, फार्मा डी, डिप्लोमा इन इन्स्ट्रुमेन्टल मुझिक, डिप्लोमा इन टॅक्सेशन,पीजी डिप्लोमा इन इंटरनॅशन रिलेशन ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज, सर्टीफिकेट इन ड्रॅमॅटिक्स, अशा ५४ अभ्यासक्रमाची १८४ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. २५ हजार २३३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. भरारी पथकाकडून एकाही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ३४५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2025

# Shivaji university VC inaugurates Times Edu Expo

TOI


SUK VC DT Shirke interacts with representatives of colleges

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** D T Shirke, the Vice-Chancellor of the Shivaji University Kolhapur, launched The Times Education Expo, a collaborative event by The Times of India and Maharashtra Times, on Saturday.

Students and parents gathered at V T Patil Hall during the opening day of the three-day exhibition to explore various educational prospects presented by institutions from Kolhapur and other parts of Maharashtra. The participating institutions showcased diverse academic programmes, ranging from defence technology degrees to fine arts courses.

"The biggest worry every parent has is getting their son or daughter admitted to good colleges and universities. Nowadays, parents prefer not just employability but also courses that will teach their sons and daughters to be future entrepreneurs. Parents, teachers, students, and educators should also visit the exhibition to get a glance at the prestigious colleges' offerings," said Shirke.

The Vice-Chancellor also interacted with staff members while visiting each exhibition stall. The programme for June 1 includes specialised seminars for parents and teachers conducted by experts. Aniruddha Das will present opportunities in hospitality and hotel management, followed by Mahesh Shinde's session about engineering admissions procedures. At noon, Vivek Velankar will talk to students and parents about career possibilities after SSC and HSC examinations.